बंजारा शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित

# कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय,

## हणेगाव.ता. देगलूर. जि. नांदेड.

## विभाग - मराठी.

**वर्ग : बी.ए.द्वितीय वर्ष Sem. IV निवडक कादंबरी वाङ्मय. पेपर VII वा.**

**प्रा. सौ. कांबळे एस. एस.**

**कादंबरीचे प्रकार** –

मराठी साहित्यातील बहुतांशी साहित्यप्रकाराचे उपप्रकार आढळतात. त्याचप्रमाणे कादंबरीचे काही उपप्रकार आहेत. उदा. सामाजिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, राजकीय कादंबरी, प्रादेशिक कादंबरी, मनोः विश्लेषणात्मक कादंबरी इत्यादी. त्यांची क्रमशः माहिती खालील प्रमाणे पाहू.

**१. सामाजिक कादंबरी** - अशा प्रकारच्या कादंबऱ्यात समान सामाजिक समस्या मांडलेल्या असतात. ज्या कादंबरीत सामाजिक समराला अधोरेखित केलेले असते, सामाजिक वास्तव मांडताना समाजाच्या स्थितीगतीचे चित्रण आलेले असते, व्यक्तिचित्रणापेक्षा समाजचित्रणावर अधिक भर असतो, त्या कादंब रीला 'सामाजिक कादंबरी' असे म्हटले जाते. या कादंबरीत समाज केंद्रस्थानी असून व्यक्ति चित्रणाला गौण स्थान असते. उदाहरणार्थ- वामन जोशी यांची 'सुशीलेचा देव', 'इंदू काळे सरला भोळे, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांची 'गावसासू', 'ब्राह्मणकन्या' इत्यादी.

**२. ऐतिहासिक कादंबरी** इतिहासकाळातील वातावरण व व्यक्तिचित्रण अशा कादंबरीतून आलेले असते. कादंबरी हा वास्तवोन्मुख साहित्यप्रकार असल्याने पात्रांच्या नोटी भाषा जास्तीत जास्त व्यवहारवर्शी, व्यव हाराच्या निकटवर्ती असावी, असे मानतात. कादंबरीच्या वेगवेगळया प्रकारात भाषिक भिन्नता असतेच. उदाहरणार्थ ऐतिहासिक कादंबरीचे निवेदन आजच्या भाषेत चालत नाही. कादंबरी ही एका लेखकाची निर्मिती व कलाकृती असते. कादंबरी विषयाच्या विश्वाप्रमाणे तिची भाषा असावी, अशी अपेक्षा असते. कादंबरीतील भाषा ही आशयानुसार बदलते. भाषेवर व्यक्तिमत्त्वाचा परिणाम होतो. व्यक्तिमत्त्वाच्या भूमिके प्रमाणेच वाङ्मयविषयक भूमिकेचाही भाषिक शैलीवर प्रभाव पडतो. स्यामुळे एका लेखकाच्या विविध कृती तून त्याची विशिष्ट शैली आपल्या लक्षात येते. वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, पु. भा. भावे, कमल देसाई, भालचंद्र नेमाडे, शेषराव मोहिते यांची विभिन्न अशी लेखनशैली कादंबरी विश्वात निर्माण झालेली दिसते.

उदाहरणार्थ : हरीभाऊंच्या 'वज्राघात', 'म्हैसूरचा वाघ, रणजित देसाई यांच्या 'श्रीमानयोगी', स्वामी, विश्वास पाटीलांच्या 'पानिपत', 'संभाजी' या कादंबऱ्यांतून व्यक्तिमनातील भाव-भावनांचे प्रकटीकरण होते.

**३. राजकीय कादंबरी :** राजकीय कादंबरीमध्ये – समाज जीवनातील राजकारणाचे चित्रण असते. राजकारणा चा मानवी मनावर आणि व्यवहारावर पडणारा प्रभाव अशा कादंबरीतून दिसून येतो. राजकारणामुळे व्यक्तीं च्या जीवनातील घडणाऱ्या बदलांचे चित्रण या कादंबरीत असते. उदा. ग. त्र्यं. माडखोलकर मुक्तात्मा (१९३९), अरुण साधू 'सिंहासन', व 'तडजोड', रा. रं. बोराडे- 'आमदार सौभाग्यवती' (१९९६) व 'नामदार श्रीमती' (२००३), पुरुषोत्तम बोरकर 'आमदार निवास रूम नंबर १७५६', १५ ऑगस्ट भागिले २६ जानेवारी' इत्यादी. या राजकीय पर्यावरणामधून साकारलेल्या कादंबऱ्यापैकी 'मेड इन इंडिया' ही बऱ्हाडी बोलीभाषेतील लक्षणीय राजकीय कादंबरी ४ प्रादेशिक कादंबरी विशिष्ट प्रदेशात इतिहासातील फक्त घटना असतात. एखाद्या घटनेच्या प्रसंगी व्यक्तीच्या मनात ज्या भावना विचार निर्माण होतात, त्या इतिहासात सांगत नाहीत. तेव्हा त्या व्यक्तीच्या मनातील भावनांचे चित्रण ऐतिहासिक कादंबरीत केले जाते.

४ **प्रादेशिक कादंबरी** विशिष्ट प्रदेशात विशिष्ट  हवामान आणि वातावरण असते. त्यातून घडलेली संस्कृती, त्यातून घडलेला माणूस अशीच साखळी कथानकातून तयार केली जाते, त्या कादंबरीला 'प्रादेशिक कादंबरी' असे म्हणतात. या प्रकारच्या कादंबरीत त्या त्या प्रदेशातील वातावरण व हवामान यांना महत्त्व असते. उदाहरणार्थ दांडेकरांची 'माचीवरला बुधा', 'पडघवली', पेंडसेंची 'एल्गार' माडगूळक रांची 'बनगरवाडी' इत्यादी. व्यक्तिप्रधान कादंबरीत केंद्रस्थानी व्यक्ती असते. त्यातील कथानके व्यक्तीभोवती फिरत असतात. व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवून तिच्याभोवती कथानक फिरत असते. उदाहरणार्थ- पेंडसेंची 'गारंबीचा बापू'. अशाप्रकारे कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या व्याख्या स्वरूप, विशेष आणि कादंबरीचे घटक यांचा मागोवा घेतलेला आहे. त्याबरोबर कादंबरी या साहित्यप्रकाराचे उपप्रकार यांचा ओघवता आढावा घेतला आहे.

५. **मनोः विश्लेषणात्मक कादंबरी** व्यक्तीच्या मनाचे विश्लेषण करण्यास प्राधान्य देणाऱ्या कादंबरी ला मनोः विश्लेषणात्मक कादंबरी असे म्हटले जाते. मानवी मनाच्या पातळीवर होणाऱ्या मानसिक भावोदोलनाचे चित्रण अशा कादंबरीत असते. मानवी मनातील बोधावस्था या प्रकारच्या कादंबरीत प्रकट होतात. उदाहरणार्थ पु. शि. रेगे यांची 'सावित्री‘ .अशाप्रकारे कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या व्याख्या स्वरूप, विशेष आणि कादंबरीचे घटक यांचा मागोवा घेतलेला आहे. त्याबरोबर कादंबरी या साहित्यप्रकाराचे उपप्रकार यांचा ओघवता आढावा घेतला आहे.

# धन्यवाद !

